# “इकडे या, कुठलीही भानगड न ठेवता मुख्यमंत्रीपद देऊ!” जयंत पाटलांची एकनाथ शिंदेंना ऑफर



| वर्ष - 6 । अंक - 138 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।गुरुवार ।दिनांक 25 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- तुकोबांचे अभंग युगानुयुगे मार्गदर्शक!
- गणेशोत्सवासाठी एक खिडकी योजना !
- कुणी केला रस्त्यांचा नरक?


### थेरगावात कॅन्सर रूग्णालय सुरू करणार

# आरोग्य सेवेत उद्योगनगरीचे "पुढचे पाऊल"!

## सन 2022-23 आर्थिक वर्षाच्या महापालिका अंदाज पत्रकात केली तरतूद

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

चांगले शिक्षण, स्वच्छ पाणी, प्रशस्त रस्ते उपलब्ध करून देणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिकेने आरोग्य सेवेत " पुढचे पाऊल" टाकले आहे. महापालिकेच्यावतीने थेरगाव येथे महापालिकेमार्फत कॅन्सर रूग्णालय सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात 'कॅन्सर हॉस्पीटल' यासाठी तरतूद करण्यात येणार आहे.



पिंपरी - चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागामार्फत शहरात सर्वोपचार सेवा असणाNया वायसीएम रूग्णालयासह १२ रूग्णालये आणि २८ दवाखाने आहेत. या माध्यमातून १५०० खाटांच्या आरोग्य सेवा महापालिका पुरविते. या सुविधांनी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात १९ लाख बाह्य रूग्णांना वैद्यकीय सेवा दिली आहे. आरोग्य सेवेच्या पायाभुत सेवेमध्ये श्रेणीवाढ करणे, आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविणे, मानांकीकृत प्रणाली प्रक्रीया आणि आचारसंहिता हे महापालिकेचे मुख्य ध्येय आहे. त्या अनुषंगाने थेरगाव येथे महापालिकेमार्फत कॅन्सर रूग्णालय सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात 'कॅन्सर हॉस्पीटल' हे 'हेड' नव्याने करण्यात येणार आहे.

**'ॲनिमिया मुक्त पीसीएमसी'ची हाक...**

**केंद्र व राज्य सरकारच्या धर्तीवर पिंपरी - चिंचवड शहर ॲनिमिया मुक्त करण्यासाठी 'ॲनिमिया मुक्त पीसीएमसी' या मोहिमेची व्यापक अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. महापालिका हद्दीत हे अभियान सामुदायिक स्तर, शालेय स्तर, महापालिका दवाखाना विंÂवा रूग्णालय स्तर तसेच खासगी क्लिनिक व हॉस्पीटल अशा प्रत्येक स्तरावर राबविण्यात येणार आहे. त्यासाठीही सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात 'ॲनिमिया मुक्त पीसीएमसी' हे लेखाशिर्ष नव्याने करण्यात येणार आहे.**

---

# महाईन्यूज इम्पॅक्ट : स्मशानभूमीतील पत्राशेड जमीनदोस्त!

## प्रशासनाची कारवाई : एकूण 27 बेकायदा बांधकामांवर कारवाई

**पिंपरी चिंचवड।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**'ब' क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत धर्मराज चौक, रावेत स्मशान भूमी, म्हस्के वस्ती येथील अनधिकृत व्यवसायिक पत्राशेडवर महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने आज बुधवारी (दि. २४) रोजी कारवाई केली. यात २४ पत्राशेड, ३ वीट बांधकाम व पत्रा बांधकाम अशी एकुण २७ बांधकामे अंदाजे १९८६.०० चौ.मी. (२१३७०.०० चौ.फुट) अनाधिकृत बांधकामे निष्कासित केली.**


महाईन्यूज

पिंपरीत खड्ड्यांचे साम्राज्य, स्मशानभूमीतही अतिक्रमणे।





या कारवाईत क्षेत्रीय अधिकारी, ब प्रभागातील धडक कारवाई पथकातील कनिष्ठ अभियंता, मनपा कर्मचारी, अतिक्रमण विभाग कर्मचारी तसेच १४ मनपा पोलिस कर्मचारी व महाराष्ट्र पोलिस सुरक्षाबल २४ कर्मचारी सहभागी झाले होते. ही कारवाई २ जेसीबी तसेच १५ मजुरांमार्फत करण्यात आली.

# तुकोबांचे अभंग युगानुयुगे मार्गदर्शक!

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी : शिळामंदिरात घेतले दर्शन



**देहुगाव ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचे जीवन प्रेरणादायी असून त्यांचे अभंग अनेक युगापर्यंत मानवजातीला मार्गदर्शन करतील असे मत राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी नोंदविले. ते (दि. 24) देहूनगरीत संत तुकाराम महाराजांच्या दर्शनासाठी आले होते. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी बुधवारी श्री संत तुकाराम महाराज शिळामंदिराचे दर्शन घेतले. यावेळी देहू संस्थानचे नितीन महाराज मोरे,संजय महाराज मोरे,भानुदास महाराज मोरे, संतोष महाराज मोरे आदी उपस्थित होते.

देहू संस्थानच्यावतीने विश्वस्तांनी राज्यपालांचा सत्कार केला.यावेळी राज्यपाल कोश्यारी यांनी देहू संस्थानच्या नोंद वहीत अभिप्रायही नोंदवला. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचे जीवन प्रेरणादायी असून त्यांचे अभंग अनेक युगापर्यंत मानवजातीला मार्गदर्शन करतील असे त्यांनी आपल्या अभिप्रायात म्हटले आहे.

### शिळा मंदिरात जाऊन दर्शन...

**देहुमध्ये राज्यपालांनी गळ्यात टाळ घेऊन भजन केले. वारकऱ्यांसह टाळ आणि मृदंगाच्या गजरात राज्यपाल तुकोबांच्या नामघोषात तल्लीन झाले होते. त्यांनतर, त्यांनी शिळा मंदिरात जाऊन तुकोबांच दर्शन घेतले.**

---

# 'जानम समझा करो', 'वाजतंय ते गाजतंय' ला प्रतिसाद

## प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद : कलाकारांचे बहारदार सादरीकरण

**पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

स्वर सर्वेश निर्मित आणि सर्वज्ञ नाट्य संस्था प्रस्तुत 'जानम समझा करो' आणि 'वाजतंय ते गाजतंय' या नाटक,सांगीतिक कार्यक्रमाचा शुभारंभाचा प्रयोग आज प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे पार पडला.हे नाटक आणि हा सांगीतिक कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरला असून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ व नाटय परिषदेचे अध्यक्ष मेघराज



राजेभोसले उपस्थित होते.

'जानम समझा करो' हे एक धम्माल म्युझिकल - डान्सीकल फर्सिकल कॉमेडी नाटक आहे. या नाटकाची निर्मिती श्रावणी संतोष चव्हाण यांची असून लेखन भाऊसाहेब पवार यांनी केले आहे. तर दिग्दर्शनाची धुरा विनोद खेडकर यांनी उचललेली आहे. कलाकार सागर पवार, तृप्ती मांढरे, अश्विनी थोरात, शुभम मांढरे, विनोद खेडकर आणि चेतन चावडा यांनी अप्रतिम अभिनय केला आहे.

'वाजतंय ते गाजतंय' गीत, संगीत आणि नृत्याने सजलेला नाट्यमय आविष्कार आहे. श्रावणी संतोष चव्हाण यांची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाची संकल्पना, दिग्दर्शन आणि नृत्याची धुरा अर्जुन दौलत जाधव यांनी सांभाळली आहे. 'नाचायां सारे पोरं या गणपती बाप्पा मोरया' या गाण्याने निर्माते संतोष चव्हाण यांनी नृत्य आविष्कार सादर केला. संगीत संयोजन विनायक वाघचौरे यांचे असून नेपथ्य श्रीकांत पोटे यांचे आहे. या कार्यक्रमात अभिनेत्री अनुपमा जोशी, संध्या नरळे, स्नेहा, मनुजा देशपांडे, मिथिला, कार्तिका बोराडे, सुकन्या, माधुरी, वैशाली, महेंद्र भांगे, शुभ रामदास, श्रावण डाखोळे, अमोल आर्या, हर्षल जाधव, नरेश पाटील,सुरभी सावंत यांचा कलाविष्कार पाहायला मिळत आहे.तसेच या वेळी सतीश परदेशी व संतोष चव्हाण यांनी कॉमेडी स्किट सादर करून प्रेक्षकांची मनं जिंकली. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे निर्माते संतोष चव्हाण आणि स्त्री वेशभूषेमध्ये स्त्री पात्र साकारणारा सचिन वाघोडे यांनी बहारदार परफॉर्मन्स दिला.

# गणेशोत्सवासाठी एक खिडकी योजना !

## प्रशासक व आयुक्त शेखर सिंह यांची घोषणा : मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन



**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

यंदाच्या वर्षी गणेशोत्सवासाठी देण्यात येणा-या सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही याची प्रशासनान दक्षता घ्यावी. तसेच गणेश मंडळांना महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्याकडून देण्यात येणा-या विविध परवानग्यांसाठी क्षेत्रीय कार्यालयात कार्यान्वित करण्यात आलेली एक खिडकी योजना सुट्टीच्या दिवशीही सुरु ठेवा, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

दि.३१ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत सर्वत्र मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा होणार आहे. पिंपरी चिंचवड शहरात साजरा होणा-या यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यासाठी तसेच क्षेत्रीय कार्यालयनिहाय आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड पोलिस यांची संयुक्त बैठक महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ,उल्हास जगताप, पोलीस उप आयुक्त मंचक इप्पर, आनंद भोईटे, शहर अभियंता मकरंद निकम, सह आयुक्त आशादेवी दुरगुडे, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, रामदास तांबे, ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, सार्वजनिक गणेश मंडळांना लागणाऱ्या महापालिका, पोलीस प्रशासन आदी यंत्रणांकडील विविध परवानग्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये एक खिडकी योजनेच्या माध्यमातून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच ही सुविधा शनिवार, रविवार अशा सुट्टीच्या दिवशीही सुरु ठेवण्यात येईल. परवानगी देताना शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महापालिकेकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, मात्र शासन, महापालिका तसेच इतर यंत्रणांनी निश्चित केलेल्या अटी शर्तींचे पालन करणे संबंधित मंडळाला बंधनकारक असणार आहे, असे आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी सांगितले.

### मिरवणूक मार्ग, विसर्जन घाट सुव्यवस्थित ठेवा...

महापालिका प्रशासनाने तात्काळ शहरातील गणेशोत्सव मिरवणुकीचे मार्ग तसेच सर्व विसर्जन घाट सुव्यवस्थित करावे. तसेच त्या ठिकाणी विद्युत व्यवस्था करावी. धरणातून करण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गामुळे नदीपात्रातील होणारी पाण्याची वाढ लक्षात घेऊन आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवावी. नदी घाटावर असणा-या कृत्रिम विसर्जन हौदांची डागडुजी करून आवश्यकतेप्रमाणे इतर ठिकाणी नव्याने कृत्रिम हौद तयार करावे. क्षेत्रीय अधिका-यांनी प्रभागस्तरावर सार्वजनिक गणेश मंडळे, गृहनिर्माण संस्था, अशासकिय संस्था, पर्यावरणवादी संघटना यांच्यासोबत बैठक घेऊन नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत आवाहन करावे, आदी सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या. महापालिका प्रशासन आणि पोलीस यांनी विसर्जन स्थळांची पाहणी करून विसर्जन घाट निश्चित करावेत, या ठिकाणांची यादी नागरिकांसाठी प्रसिध्द करावी. कंट्रोल रूम तयार करून त्याद्वारे परिस्थितीवर लक्ष ठेवावे, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिले.

---

### मनसेच्या संतप्त कार्यकर्त्यांनी महावितरण अधिका-यांना घातला घेराव

# महावितरणवर मनसेचा 'हल्लाबोल'

### सेक्टर 22 मध्ये वीज पुरवठा खंडीत असल्यामुळे नागरिकांचे हाल

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

निगडी सेक्टर२२ मध्ये विजेचा लपंडाव सुरू आहे. गेली चार ते पाच महिने वीज खंडीत होत आहे. ही बाब महावितरण अधिका-यांच्या लक्षात आणून दिली. तरीही, याकडे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. अधिका-यांच्या गलथान कारभारामुळे विजेचा खोळंबा होत आहे. याच्या निषेधार्त मनसेने आज निगडी प्राधिकरण उपविभागीय विद्युत कार्यालयावर आंदोलन केले. लावकरात लवकर वीज पुरवठा सुरळीत करावा. अन्यथा मनसे स्टाईने तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी महावितरणच्या अधिका-यांना दिला आहे. प्रभाग क्रमांक १३ सेक्टर २२ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीत गेली कित्येक दिवस विद्युत पुरवठा खंडीत आहे. फातिमा मज्जित समोरील ई-बिल्डिंग येथे गेली चार ते पाच महिन्यापासून डिओ जाणे, केबल त्रुटी निघणे, जम जाणे या समस्या होत आहेत. याकडे विद्युत विभागाच्या कर्मचा-यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे प्रभागात अंधार पसरत आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. ज्यांचे ऑनलाईन काम आहे, त्यांच्या कामाचा खोळंबा होत आहे. याला विद्युत प्रशासन जबाबदार आहे, असा आरोप चिखले यांनी केला आहे.



> **या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला. अधिका-यांना पत्रव्यवहार केला. तरीही समस्या जैसे थेच आहे. समस्या सुटत नसल्यामुळे आमच्यावर आंदोलन करण्याची वेळ आली आहे. विद्युत प्रशासनाच्या गलथान कारभाराची सजा सर्वसामान्यांना मिळत आहे. लवकरात लवकर वीजेची समस्या सोडवावी. ई-बिल्डींगला नवीन केबल लवकरात लवकर टाकण्यात यावी. विद्युत पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा मनसे यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन करेल.**
>
> **- सचिन चिखले,**
> **शहराध्यक्ष, मनसे.**

---

# आयुक्तांसमोर "प्रझेंटेशन"

### प्रत्येक विभागाच्या कामकाजाचा आढावा

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर शेखर सिंह हे महापालिकेतील विविध विभागामध्ये सध्यस्थितीत हे काय कामकाज सुरू आहे, कोणते नवीन प्रकल्प राबविले जात आहेत. संबंधित विभागांमार्फत भविष्यात काय नवीन करण्यात येणार आहे, याची सविस्तर माहिती घेत आहेत. त्यामुळे सर्वच विभागाचे प्रमुख विभागातील इत्यंभूत माहिती गोळा करून आयुक्तांसमोर पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण करत आहेत.

पिंपरी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांची 16 ऑगस्ट रोजी मुदतपूर्व बदली झाली. त्यांच्या जागी साताऱ्याचे जिल्हाधिकारी सिंह यांची पिंपरी पालिका आयुक्तपदी राज्य सरकारने नियुक्ती केली. त्यांनी (दि.18) ऑगस्ट रोजी आयुक्त आणि प्रशासक पदाचा पदभार स्विकारला. सिंह यांनी यापुर्वी नगरपरिषदांमध्ये आणि जिल्हाधिकारी म्हणून ग्रामीण भागात

**आयुक्त शेखर सिंह घेताहेत सविस्तर माहिती**



कामकाज केले आहे.

शहरी भागात आणि विशेषतः महापालिका आयुक्त म्हणून सिंह यांची पहिलीच नियुक्ती आहे. त्यामुळे सिंह यांनी महापालिका आयुक्त म्हणून नियुक्ती झाल्यानंतर सर्व विभाग प्रमुखांबरोबर संवाद सुरू केला आहे. पालिकेच्या विविध विभागांमध्ये काय कामकाज सुरू आहे, सद्यस्थितीत कोणते प्रकल्प राबविले जात आहेत, संबंधित विभागांमार्फत भविष्यात नवीन काय करण्यात येणार आहे, याची सविस्तर माहिती सिंह घेत आहेत.

## संपादकीय »

# कुणी केला हो रस्त्यांचा नरक?

***एकीकडे बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, सागरी मार्ग, मेट्रोचे जाळे, प्रत्येक मोठ्या शहराबाहेर वर्तुळाकार बाह्यमार्ग अशी अनेक स्वप्ने महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या गळ्यात बांधणाऱ्या राज्यातील त्रिस्तरीय कारभाऱ्यांना 'खड्डे नसणारे रस्ते' हे साधे आणि किमान काम मात्र आजतागायत करता आलेले नाही.***

देशात सर्वाधिक अपघात महाराष्ट्रात होतात आणि सर्वाधिक रस्तेबळीही जातात. जितके बळी जातात, त्याच्या साधारण अडीचपट नागरिक जखमी होतात. त्यातले अनेक कायमचे अपंग होतात. हे सारे अपघात खड्ड्यांमुळे होतात, असे नाही; मात्र राज्यभरातल्या असंख्य खड्ड्यांनी असुरक्षित, बेपर्वा आणि जिवावर उदार होऊन प्रवास करण्याची जी संस्कृती जन्माला घातली आहे; तिचाच हा सारा परिणाम आहे. अगदी परवा पुणे ते नाशिक मार्गावर खड्डे चुकविण्याच्या नादात कारला झालेल्या अपघातात केवळ १९ वर्षांचा प्रवासी मुलगा मरण पावला. त्याचा काय दोष किंवा गुन्हा होता? अशी असंख्य उदाहरणे राज्यभर अहर्निश घडत आहेत. माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूचा प्रश्न विधिमंडळात निघाला; तेव्हा उपमुख्यमंत्र्यांनी चालकाच्या चुकीमुळे हा अपघात झाल्याचे सांगितले. यावेळी, आमदार वर्षा गायकवाड यांनी 'सर्वच महामार्गांवर अपघात होत आहेत आणि त्यांचे कारण खड्डे हेच आहे,' हे सांगितले. कोकणात चाळण झालेल्या रस्त्यावर आपल्या डोळ्यांदेखत झालेल्या अपघाताचे उदाहरणही त्यांनी दिले. राज्यभरातल्या स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य सरकार आणि राष्ट्रीय महामार्गांबाबत केंद्र सरकार असे सगळे राज्यातील या दुर्दशेला जबाबदार आहेत. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात बोलताना, 'दोन वर्षांत मुंबईतील प्रत्येक रस्ता सिमेंटचा होईल,' असे आश्वासन दिले. प्रत्येक गल्लीबोळ सिमेंटचा करणे, हे या समस्येवरचे खरे उत्तर नाही, हे तज्ज्ञांनी सरकारला सांगायला हवे. काही काळापूर्वी जागरूक नागरिकांमुळे सिमेंटचे सदोष रस्ते फोडून पुन्हा टाकावे लागले होते. डांबराचाही उत्तम रस्ता अनेक वर्षे टिकतो आणि अतिपावसाने खराब होत नाही. मुंबईचा मरीन ड्राइव्ह किंवा पुण्यातील जंगली महाराज रस्ता ही त्याची उदाहरणे आहेत; पण आपल्याकडे एखादे खूळ निघाले, की सगळे त्याच्याच मागे धावत सुटतात. त्यात बरेच हिशेब असतात.




## आनंदी सकाळ

# अब मोहि दोन न लाई।।'

कबीर बाजारात उभा आहे. तो सर्व धर्मांचे कल्याण इच्छितो. त्याची कोणाशी मैत्री नाही, वैर नाही. धर्म भेदातीत आहे. सर्व मानव एक आहे. कबीरांचे लौकिक आणि अलौकिक जीवन जगावेगळे आहे. ते मुस्लिम घरात वाढले; पण मुस्लिम नव्हते. हिंदू धर्माकडे प्रवृत्ती असूनही हिंदू नव्हते. विरक्त असून संन्यासी नव्हते. रामानंदांचे शिष्य असूनही वैष्णव नव्हते. योगी असूनही योगी नव्हते. कबीर स्वत:ला जुहाला (विणकर) म्हणवत. केंद्रस्थानी उभे राहून, सभोवती असणाऱ्या विविध धर्म व पंथांच्या गुण-दोषांचे तटस्थतेने निरीक्षण करणारे आणि त्यातील दोषांवर कठोर प्रहार करणारे कबीर आत्मसाक्षात्कारी जीवन्मुक्त संत होते. ईश्वरी आदेश म्हणून लोकांना खऱ्या कल्याणाचा मार्ग दाखवीत असताना, जीवाचा कितीही आटापिटा केला; तरीही आपले कोणी ऐकत नाही, याचे त्यांना फार आश्चर्य व खेद वाटत असते. ते म्हणत, 'ना कौई जानै, न कोई मानै। ताने अचरज मोई। अपने अपने रंग के राजा। मानत नाही कोई।।कह कबीर मैं काही काही हाऱ्यो। अब मोहि दोन न लाई।।'म्हणजे हवा सर्वत्र असूनही ती घेण्याची क्षमता संपते. देवाचे तसेच आहे.

# अर्थव्यवस्थेला फायदा-तोट्याचा ताळेबंद आवश्यक




गेल्या वर्षभरात करोनाची तिसरी लाट, तेलांची दरवाढ यामुळे तथाकथित अर्थतज्ज्ञांची दाणादाण उडालेली सर्वसामान्य जनतेने अनुभवलेली आहे. उत्तर प्रदेशातील निवडणुका 'औरंगजेब', 'जीना' आदींविरुद्ध लढवून जिंकल्यानंतर आणि खऱ्या हिंदुत्वासाठी ठाकरे सरकार भुईसपाट केल्यानंतर आता पुन्हा केंद्र सरकार खासगीकरणाचा रेटा लावण्यास तयार होत आहे. खासगीकरणाची ही सुसाट वेगाने येणारी ट्रेन विरोधी नेत्यांच्या एखाददुसऱ्या आंदोलनाने किंवा सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या जनहीत याचिकेने थांबणार नाही, तर फक्त जनतेच्या दबावानेच थांबू शकते आणि त्यासाठी आतापर्यंतच्या खासगीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेला झालेल्या फायदा-तोट्याचा ताळेबंद बघणे आवश्यक आहे.

गेल्या तीन दशकांहून जास्त काळ चालू असलेल्या राष्ट्रीयीकृत उद्योगाच्या खासगीकरणाच्या संबंधित तपशील कुठल्याही सरकारी संकेतस्थळावर पूर्णपणे उपलब्ध नाही. खासगीकरणाचा राष्ट्रीय आणि विशेषत: स्थानिक अर्थव्यवस्थेवरील परिणामाबद्दल कुशल मनुष्यबळाच्या व डिजिटायझेशनच्या बाता मारणाऱ्या सरकारने कुठेही संकलित माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे या लेखात फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटी, एशियन डेव्हलपमेंट बँक, विकीपीडिया, तसेच इतर राष्ट्रीय संस्थांच्या अभ्यासाचा संदर्भ घेतला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली जनतेपासून माहिती दडवण्याची जगभरात सर्व सरकारांना सवय आहे. बहुतांशी ती माहिती सरकारशी संबंधितांचे लागेबांधे असण्याशी संबंधितच असते; परंतु जनतेला राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबत भावनिक साद घालून ही माहिती लपवणे सहजशक्य आहे, हा जगभरातील सरकारचा अनुभव आहे. सरकारी उद्योगांच्या खासगीकरणाचा व राष्ट्रीय सुरक्षेचा जरादेखील संबंध नसताना ही माहिती सरकारमार्फत उपलब्ध नसणे हे संशयास्पद आहे. त्यामुळे खासगीकरणात काही व्यक्तींचा आणि उद्योगाचा बेसुमार फायदा होत आहे, ह्या शंकेला विश्वासार्हता प्राप्त होत आहे. भारत ॲल्युमिनियम कंपनी (बाल्को) हे नाव बहुतांशी जनतेच्या विस्मरणात गेले आहे. सन १९६५ मध्ये या सार्वजनिक कंपनीची स्थापना भारताला ॲल्युमिनियम उत्पादनात स्वयंपूर्ण करण्यासाठी झाली. काही वर्षांतच तो हेतू पूर्ण झाला. कारण 'बाल्को' आणि बिर्लाची कंपनी 'हिंडाल्को'मधल्या स्पर्धेमधून उत्पादन वाढले; त्याचबरोबर बेसुमार भाववाढीला आळा बसला.

# पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा..

**जुन्या निष्ठावंतांना अडगळीत टाकण्याच्या राजकीय सवयीस आव्हान देण्याचे धाडस काँग्रेसच्या निष्ठावंतांनी दाखवले तरी लोकशाहीप्रेमींना ते स्वागतार्हच..**

तसे पाहू गेल्यास आपल्याकडे पक्षांतर्गत निवडणुका म्हणजे केवळ थोतांड आणि शुद्ध कायदेशीर उपचार. अपवाद फक्त डाव्यांचा. ते पक्षांतर्गत निवडणुका सर्वसाधारण निवडणुकांपेक्षाही अधिक प्राणपणाने लढतात, त्यातच जायबंदी होतात आणि मग अन्यांशी लढण्याची ताकदच त्यांच्यात राहात नाही. हे डावे वगळता अन्य पक्षांच्या निवडणुका म्हणजे केवळ निवडणूक आयोगाच्या अटींची पूर्तता करण्यासाठीचा सोपस्कार. सरकारी निविदा ज्याप्रमाणे कोणास मिळणार हे आधी निश्चित झाल्यावर त्यांच्या बोलीचा सोपस्कार केला जातो त्याप्रमाणे आपल्या पक्षांतर्गत निवडणुकांत राजकीय पक्ष आधी विजयी उमेदवार निश्चित करतात आणि नंतर अन्य प्रक्रियेचे नाटक केले जाते. पण इतकी पोकळ, दिखाऊ आणि कामचलाऊ प्रक्रियादेखील पूर्ण करण्याच्या परिस्थितीत काँग्रेस पक्ष दिसत नाही. गेल्या आठवड्याभरात गुलाम नबी आझाद आणि आनंद शर्मा



यांचे पक्षसंघटनेतील पदांचे राजीनामे हेच दर्शवतात. या साऱ्यावर भाष्य करण्याआधी आझाद आणि शर्मा यांचे अभिनंदन आणि त्यांच्या राजीनाम्याचे स्वागत. ज्या दिवशी काँग्रेसच्या पक्षांतर्गत निवडणुकांची प्रक्रिया सुरू होणे अपेक्षित होते, त्याच दिवशी आनंद शर्मा यांनी हिमाचल प्रदेश संघटनेतील पदाचा राजीनामा दिला. रविवारी काँग्रेसची एक महिन्याची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली. म्हणजे आणखी एक महिन्याने, २० सप्टेंबर रोजी या पक्षास नवा अध्यक्ष मिळायला हवा. पण तसे होणार का, अवघ्या दोन आठवड्यांवर आलेली काँग्रेसची राष्ट्रव्यापी पदयात्रा खरोखरच देशभर पायधूळ झाडणार का या प्रश्नांस सध्या तोंड फुटले असले तरी आझाद, शर्मा यांचा पदत्याग आणि आणखीही काहींची पदत्यागाची शक्यता यातून काँग्रेसमधील गोंधळ चव्हाट्यावर येतो. त्यावर भाष्य करण्याआधी आझाद आणि शर्मा यांच्या राजीनाम्याविषयी.

या दोघांस पदत्याग करावासा वाटला याचे कारण त्यांच्या मनात दाटलेली अपमानाची वेदना. हा अपमान थेट ना हंगामी पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांनी केला ना त्यांच्या चिरंजीवांनी. पक्षाच्या वतीने त्या त्या राज्यांतील कारभारासाठी ज्या काही समित्या नेमल्या गेल्या त्यांच्याकडून अप्रत्यक्षपणे या उभयतांचा अपमान झाला. त्यांची ही भावना समर्थनीय ठरते. कारण काँग्रेसची ही जुनी सवय. अलीकडे डावे वगळता अन्य बऱ्याच पक्षांनी तिचा अंगीकार केला असला तरी अन्य अनेक मुद्द्यांप्रमाणे या सवयीचे जनकत्व नि:संशय काँग्रेसकडे जाते. जरा एखाद्या नेत्यास जनाधार असल्याचा संशय आला रे आला की त्याच्या पंखछाटणीच्या कामास निष्ठावंतांना जुंपायचे; हा तो काँग्रेसी खाक्या. शर्मा यांना त्यांचे जन्मस्थळ असलेल्या हिमाचलात अल्प प्रमाणात का असेना पण जनाधार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विधीमंडळाच्या पायऱ्यांवर सत्ताधारी आणि विरोधक भिडले!

## शिवीगाळ केल्याचा मिटकरींचा आरोप, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

।मुंबई ।महाईन्यूज ।

**विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्याच्या मुद्द्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आल्याने वातावरण तापलं आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आणि महेश शिंदे यांनी एकमेकाला धक्काबुक्की केली. दरम्यान सत्ताधाऱ्यांनी शिवीगाळ केल्याचा आरोप अमोल मिटकरी यांनी केली असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली आहे. यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत.**



### शिंदे गटाचे भरत गोगावले यांचा इशारा

"आम्ही यांचा सगळा इतिहास बाहेर काढला. करोनाचा काळ, सिंचन घोटाळा, नवाब मलिक, अनिल परब यांची वस्तुस्थिती आम्ही मांडली. आमचं झाल्यानंतर पायऱ्या रिकाम्या केल्या असत्या. पण आम्ही बोलत असतानाच गोंधळ घालत लक्ष विचलित करायचं हा कोणता प्रकार आहे. आम्ही काय बांगड्या भरल्या आहेत का? आम्ही जशास तसं उत्तर दिलं आहे. त्यांनी आमचा नाद करायचा नाही. कारण आम्ही कोणाला पाय लावत नाही. चुकून पाय लागला तर आम्ही नमस्कार करु, पण कोणी आम्हाला पाय लावण्याचा प्रयत्न केला तर सोडणार नाही." असा इशारा शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी दिला आहे.

आजचं कामकाज सुरु होण्याआधीच सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडले. विरोधकांकडून '५० खोके एकदम ओके अन् खावून खावून माजलेत बोके!' अशा घोषणा दिल्या जात होत्या. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदार विधीमंडळाच्या पायऱ्यांवर उपस्थित असल्याने विरोधकांनी आमची जागा हायजॅक केल्याचा आरोप केला. यानंतर सत्ताधारी आणि विरोधक आमदार अक्षरश: एकमेकांच्या अंगावर धावून गेल्याचं चित्र होतं. यावेळी शिंदे गटातील आमदार महेश शिंदे आणि अमोल मिटकरी यांच्यात जोरदार वाद झाला."५० ओके एकदम ओके ही घोषणा त्यांच्या फार जिव्हारी लागली. ते नाराज झाले असल्यानेच आज त्यांच्यातील काही आमदार येथे आले असून, घोषणा देत आहेत. विधीमंडळात अशा गोष्टी घडत असतात. पण त्यांच्या वागण्यातून मनाला लागलं असल्याचं स्पष्ट दिसत आहे," अशी प्रतिक्रिया विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी दिली आहे.तुम्हाला धक्काबुक्की झाली का? असं विचारलं असता ते म्हणाले "अरे हाड! ते काय आम्हाला धक्काबुक्की करणार, आम्हीच त्यांना धक्काबुक्की केली".

### शॉर्ट न्यूज

#### शिंदे-फडणवीसांचे सरकार ही सत्तेसाठीची आर्थिक तडजोड!



। मुंबई ।।महाईन्यूज ।

गेल्या दोन-तीन महिन्यांपासून राज्यात जे सुरू आहे, ते महाराष्ट्रासाठी चांगले नाही. सध्याचे शिंदे-फडणवीसांचे सरकार हा सत्तेचा तात्पुरता आर्थिक समझोता असल्याची टीका मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी केली.मनसे पदाधिकाऱ्यांचा मेळाव्यात मार्गदर्शन करताना ठाकरे यांनी शिवसेनेवरही टीकास्त्र सोडले. तसेच पक्षवाढीसाठी कार्यकर्त्यांना आवाहन केले. ज्या महाराष्ट्राने देशाचे प्रबोधन केले, त्याच महाराष्ट्राचे प्रबोधन करण्याची वेळ आली असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.मनसेने कोणतेही आंदोलन अर्धवट सोडले नाही. आपल्या आंदोलनामुळे राज्यातील ६५ टोलनाके बंद झाले. टोलचा पैसा सगळ्या पक्षांकडे जातो, असा आरोप करतानाच टोलमुक्त महाराष्ट्रचे आश्वासन देणाऱ्यांनी सत्तेत असताना त्याची पूर्तता का केली नाही याबद्दल त्यांना जाब विचारण्याचे आवाहनही त्यांनी केले.


# "शिरसाट यांचं काय होणार? एक टोपी घेतली, दुसरीवर अन्याय का?"

## जयंत पाटलांची तुफान फटकेबाजी; सभागृहात पिकला हशा

।मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे राज्यात सत्तांतर झाले. सध्या राज्याचा कारभार शिंदे गट-भाजपा संयुक्तपणे पाहात आहेत. दरम्यान, सध्या सुरू असलेल्या राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये या सत्तांतर नाट्यावर खरपूस चर्चा होत आहे. आजदेखील (२४ ऑगस्ट) जयंत पाटील यांनी एकनाथ शिंदे यांची बंडखोरी आणि मंत्रीपद तसेच खातेवाटपावरून शिंदे गट-भाजपात असलेल्या नाराजीवरून टोलेबाजी केली. त्यांनी शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांना कुठे ॲडजस्ट करणार, औरंगाबादची एक टोपी घेतली

पावसाळी अधिवेशन 2022



(अब्दुल सत्तार) दुसऱ्या टोपीवर (हरिभाऊ राठोड) अन्याय का? अशी मिश्किल टिप्पणी केली. "तुम्ही अब्दुल सत्तार यांना मंत्री केलं. संदीपान भुमरे यांना मंत्री केलं. आता आमच्या संजय शिरसाट यांचं काय होणार? शिरसाट यांना काही चान्स आहे का? एका जिल्ह्यात दोन मंत्री झाले. संजय शिरसाट यांना कसं ॲडजस्ट करणार? हरिभाऊ रोठोड यांनी आरएसएसचं काम खूप वर्षे केलं. त्यांना एकदा विधानसभेचं अध्यक्ष केलं. त्यावेळी ते चिडले होते. औरंगाबाद जिल्ह्याची एक टोपी घेतली मग दुसरी टोपी का नाही घेतली? जी निष्ठेची टोपी आहे ती बाहेर ठेवली," अशी टोलेबाजी जयंत पाटील यांनी केली.



### जयंत पाटील यांची टोलेबाजी

**सध्या सुरू असलेल्या राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये या सत्तांतर नाट्यावर खरपूस चर्चा होत आहे. आजदेखील (२४ ऑगस्ट) जयंत पाटील यांनी एकनाथ शिंदे यांची बंडखोरी आणि मंत्रीपद तसेच खातेवाटपावरून शिंदे गट-भाजपात असलेल्या नाराजीवरून टोलेबाजी केली. त्यांनी शिंदे गटातील आमदार संजय शिरसाट यांना कुठे ॲडजस्ट करणार, औरंगाबादची एक टोपी घेतली (अब्दुल सत्तार) दुसऱ्या टोपीवर (हरिभाऊ राठोड) अन्याय का? अशी मिश्किल टिप्पणी केली.**

"आमच्या काँग्रेसच्या विचाराच्या माणसाला तुम्ही खांद्यावर घेतलं. अब्दुल सत्तार आमचे मित्र आहेत. ते २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमच्याच पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवणार आहेत. हरिभाऊ राठोड यांच्यासारख्या भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांचा यावेळी विचार का नाही केला?" असे मिश्किल भाष्य करत त्यांनी भाजपा तसेच शिंदे गटातील असंतुष्ट नेत्यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. पुढे त्यांनी एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची खुली ऑफर दिली. "मनावर दगड ठेवून एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केलं आहे, असे चंद्रकांत पाटील एका बैठकीत म्हणाले होते. भारतीय जनता पक्षाने मनावर दगड ठेवून आमच्या शिंदे यांना मुख्यमंत्री केले असेल तर कुठलीही भानगड ठेवता आम्ही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री होण्याची संधी देऊ. तुमच्यातील गुण पाहता तसे करण्यास कोणीही नकार देणार नाही," असे मिश्किल भाष्य करत जयंत पाटील यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली.

# ‘महाराष्ट्राची मान तुमच्या शरणागतीने शरमेने खाली गेली’!

## जयंत पाटलांचा मुख्यमंत्री शिंदेंवर हल्लाबोल


**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



‘देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, अशी आमची अपेक्षा होती. एवढा सगळा सुरत गुवाहाटीचा प्रवास केला. शिवाजी महाराजांनी 17 वेळा सुरत लुटली. त्याच सुरतेला तुम्ही शरणागतीसाठी गेला. स्वारी करण्यासाठी नव्हे. तुमच्या शरणागतीने महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली’, अशा शब्दांत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला. विधानसभेचा आज पाचवा दिवस आहे. या पाचव्या दिवशी विरोधक आणि सत्ताधारी चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

“पुढे सुरतेवरुन तुम्ही गुवाहाटीला गेला. तिथे तुम्ही कामाख्या देवीच्या दर्शनाला गेला होतात म्हणे. पण तिथे अनेकांनी डोंगार, झाडी-हाटील पाहिले. हा सगळा प्रवास करुन झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असे आम्हाला वाटले. पण देवेंद्र

**पावसाळी अधिवेशन 2022**



फडणवीस जे सांगतात ते पंतप्रधान नरेंद्र मोदी ऐकतात, अशी अगोदर आमची खात्री होती. पण आता तो आमचा समज आहे” असे जयंत पाटील यांनी म्हटले. “सुरत गुवाहाटीचा प्रवास केल्यावर तेच मुख्यमंत्री होतील, असं सगळ्यांना वाटायचं, पण त्यांना सीएम इन वेटिंग केलं डायरेक्ट. म्हणजे ज्या नेत्याला पंतप्रधान होण्याचा योग भविष्यकाळात येऊ शकतो, असं आम्ही समजत होतो. त्या नेत्याला उपमुख्यमंत्री करुन महाराष्ट्राच्या एका नेत्याचा भाजपने अपमान केला. भाजप शिवसेना सरकार सत्तेत असताना एकनाथ शिंदेंची मी एक क्लिप पाहिली. त्यात ते भाजपच्या कारभारावर चिडून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हातात राजीनामा देतात”

“पण आज गुवाहाटीला जाऊन भाजपसोबत हातमिळवणी करुन शिंदेंनी सरकार स्थापन केले. त्याचवेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुत्राला म्हणजेच उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवरुन खाली खेचताना त्यांना माहिती नाही पण शिवसैनिकांना प्रचंड वेदना झाल्या. तर मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्या घेतल्या एकनाथ शिंदे बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळी जातील, असं वाटलं होतं, पण फार दिवसांनी त्यांना बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळाची आठवण झाली” असे जयंत पाटील यांनी म्हटले. “खातेवाटपात काय झाले. चंद्रकांतदादांवर किती अन्याय. उच्च आणि तंत्रशिक्षण खाते चंद्रकांतदादांना दिले. मंत्रिमंडळात एकच ध्रुवतारा आहे. तो म्हणजे गुलाबराव पाटील. त्यांचे पाणीपुरवठा खाते कुणालाही बदलता आलं नाही... सगळ्यांची खाती बदलली पण त्यांचं खातं बदललं नाही. आमचे शंभूराज देसाई किती तुमची बाजू घ्यायचे पण त्यांनाही एक्साईज डिपार्टमेंट दिले”, असेही जयंत पाटील यांनी म्हटले.

# आणीबाणी, लोकशाहीच्या नावाखाली देशात हुकूमशाही

## पटोलेंचा भाजपवर हल्लाबोल

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सध्या राज्यासोबतच देशाचं राजकारण सुद्धा मोठ्या प्रमाणावर बदलत आहे. 2014 च्या निवडणुकांनंतर देशात भाजपाची सत्ता आली. लोकशाही व संविधानाच्या तत्वांवर देशात आजपर्यंत सरकारे काम करत होती परंतु 2014 पासून भारतीय जनता पक्षाचे(bjp) केंद्रातील सरकार हुकूशाही पद्धतीने काम करत आहे. 2014 पासूनच देशात आणीबाणी सुरू असून विरोधकांची सरकारे पाडण्यासाठी व विरोधी पक्ष फोडण्यासाठी भाजपा ईडी, सीबीआय, आयकर सारख्या यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचे पुन्हा-पुन्हा स्पष्ट होत आहे, असा थेट हल्लाबोल महाराष्ट्रात प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. प्रसार माध्यमांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, भाजपा(bjp) फोडा व राज्य करा या इंग्रजांच्या नितीप्रमाणे राजकारण करत असून जे नेते वा राजकीय पक्ष भाजपाला साथ देत नाहीत त्यांच्या घरांवर सीबीआय, ईडीची कारवाई केली जात आहे.



देशातील विरोधक संपवण्याचे काम भाजपा करत आहे. दिल्लीत आम आदमी पक्षाच्या मनीष सिसोदिया, तसेच राष्ट्रीय जनता दलाच्या आमदाराच्या घरावर सीबीआयने टाकलेले छापे हेच दाखवतात. सीबीआय, ईडी, आयकर या यंत्रणांचा राजकीय इप्सित साधण्यासाठी भाजपा गैरवापर करत आहे. बिहारची सत्ता गेल्याने भाजपा बिथरली आहे. भाजपाची साथ देणाऱ्यावर कारवाई होत नाही. देशात इंग्रजांपेक्षाही क्रूर पद्धतीने भाजपा काम करत आहे. जनतेल्या दिलेल्या आश्वासनाला भाजपाला विसर पडला आहे. महागाई कमी करू, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करु, दरवर्षी 2 कोटी नोकऱ्या देऊ, परदेशातून काळा पैसा परत आणू अशी वारेमाप आश्वासने देऊन भाजपा केंद्रात सत्तेवर आला पण सत्तेत आल्यापासून हे सरकार फक्त मुठभर उद्योगपतींसाठीच काम करत आहे,

# बिहारमध्ये ‘महागठबंधन’ सरकारला ग्रीन सिग्नल !

## नितीश कुमार यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला

**। पाटणा। । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षानंतर बिहारमध्येही सत्तापालट झाला आहे. आज बिहारमध्ये विशेष अधिवेशनात नितीश कुमार यांनी आवाजी मतदाराने विश्वासदर्शक ठराव जिंकला. या विशेष अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर, बिहारमधील सत्तासंघर्षावर आज पूर्णविराम मिळाला आहे.

सत्ताधारी आमदारांनी नितीश कुमार यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला होता. आज विशेष अधिवेशनात अविश्वास प्रस्तावासाठी आज आवाजी मतदान घेण्यात आले.



या आवाजी मतदानात नितीश कुमार यांच्या बाजूने मतदान झाल्याने त्यांनी विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. दरम्यान, विश्वासदर्शक ठराव होण्याआधी भाजपा नेते विजय कुमार यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तर, जनता दल युनायटेडचे सर्वेसर्वा नितीश कुमार यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. तसेच, बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनीही केंद्रावर हल्ला चढवला. त्यामुळे संतापलेल्या भाजपा आमदारांनी सभात्याग केला.

बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव म्हणाले की, “ईडी, सीबीआय आणि आयकर विभाग हे सरकारचे तीन जावई आहेत. जे भाजपाला शरण जात नाहीत, त्यांच्यावर या जावायांकडून दबाव आणला जातो.”

महाराष्ट्रात ज्याप्रमाणे सत्तासंघर्ष पाहायला मिळाला अगदी तसाच बिहारमध्येही संघर्ष घडला. भाजपासोबत सत्तेत असलेल्या नितीश कुमार यांनी भाजपसोबतची युती तोडली आणि राष्ट्रीय जनता दलासह कॉंग्रेस आणि डावे पक्षासोबत आघाडी करत सत्ता स्थापन केली.

# सिसोदियांचा ‘शिंदे’ करण्याचा भाजपाचा अयशस्वी प्रयत्न, आपचा आरोप!

**दिल्ली महाईन्यूज । प्रतिनिधी।**

दिल्लीती आम आदमी पार्टी आणि भाजपात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडतच आहेत. भाजपाने आपचे आमदार फोडण्याचा प्रयत्न केला. तसेच केजरीवाल सरकारमधील उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचा ‘शिंदे’ करून महाराष्ट्रासारखा प्रयोग येथेही करण्याचा प्रयत्न भाजपाने केला पण त्यात यशस्वी झाले नाहीत, असा दावा आपने केला आहे.

राज्यउत्पादनशुल्कधोरणातील कथित अनियमिततेप्रकरणी मनीष सिसोदिया यांच्यासह 15 जणांविरुद्ध सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. यावरून आप आणि भाजपामध्ये कलगीतुरा रंगला आहे. दिल्लीतील केजरीवाल सरकार पाडण्यासाठी मोदी सरकार केंद्रीय तपास यंत्रणांचा कशाप्रकारे वापर



करत आहे, हे उघड करू, असा दावा आपचे नेते संजय सिंह यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

आपच्या आमदारांना 20 कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली, ही ऑफर स्वीकारली नाही तर, मनीष सिसोदियांप्रमाणेच सीबीआय चौकशीला सामोरे जा, अशी धमकी भाजपाने दिल्याचा दावाही आपने केला आहे. 20-25 आमदार संपर्कात असल्याचा दावाही भाजपाने केला आहे. दिल्लीच्या शिक्षण धोरणामुळे भाजपा अस्वस्थ झाली आहे. त्यांना देश विकायचा आहे. तर, केजरीवाल यांना देश वाचवायचा आहे, असे सांगून, सावध राहा, येथील आपचे सरकार विकावू नाही, असा इशारा संजय सिंह यांनी दिला.

सत्ता आणि ताकदीचा वापर करून लोकशाहीचे वस्त्रहरण केले जात आहे, अशी टीका आपचे आमदार सोमनाथ भारती यांनी केली आहे.

भाजपा नेत्याने मलाही फोडण्याचा प्रयत्न केला. आमच्यासोबत या, नाहीतर तुमची पण हालत मनीष सिसोदिया यांच्यासारखी करू, अशी धमकी आपल्याला दिल्याचे आपचे आमदार सोमनाथ भारती यांनी सांगितले. 20 कोटी रुपये तयार आहेत आणि आणखी आमदार आणले तर 25 कोटी रुपये मिळतील, अशी ऑफर भाजपाने दिल्याचा दावा त्यांनी केली. आपचे आणखी एक आमदार संजीव झा यांनी देखील आपल्याला देखील अशीच ऑफर आल्याचा दावा केला.

# आथिया आणि केएल राहुलचं 'या' दिवशी होणार लग्न...

बॉलिवूड अभिनेत्री आथिया शेट्टी आणि भारतीय क्रिकेटर केएल राहूल यांच्या लग्नाची चर्चा मागील अनेक दिवसांपासून चालू आहे. अनेकांचे त्यांच्या लग्नाकडे लक्ष लागून राहिले आहे. अशातच अभिनेता सुनिल शेट्टीने आथिया शेट्टी आणि क्रिकेटर केएल राहूलच्या लग्नाबाबत काही खुलासे केले आहेत. सोशल मीडियाद्वारे समोर आलेल्या या व्हिडीओमध्ये सुनील शेट्टीला आथिया आणि राहूलच्या लग्नाबाबत प्रश्न विचारला गेला. त्यावेळी सुनिल शेट्टीने लग्नाच्या तयारी बाबत खुलासा केला आहे.

लग्नाच्या प्रश्नावर सुनिल शेट्टीचं उत्तर सुनिल शेट्टीला प्रश्न विचारण्यात आला की,



त्यावेळी तो म्हणाला की, "मला वाटतं हे सर्व मुलंच ठरवतील. राहुल सध्या आशिया कपमध्ये व्यस्त आहे. वर्ल्ड कप आहे. साउथ अफ्रिका टूर आहे, ऑस्ट्रेलिया टूर आहे. त्यामुळे जेव्हा त्यांना वेळ मिळेल त्या पद्धतीने ते लग्नाची तारीख ठरवतील. आता एका दिवसाच्या सुट्टीवर तर लग्न होऊ शकत नाही ना."

# विजयादशमीच्या मुहूर्तावर 'शिवप्रताप'

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती आज संपूर्ण जगभर अभ्यासली जात आहे. महाराजांनी कशाप्रकारे शून्यातून स्वराज्य निर्मिती करत रयतेच्या राज्याची स्थापना केली याचे धडे जगभरातील सैनिकांना दिले जातात. रक्ताचा एकही थेंब न सांडता शत्रूच्या तावडीतून कशा प्रकारे सहिसलामत निसटून शत्रूवर मात येऊ शकते याचे उदाहरण शिवकालीन इतिहासात पहायला मिळतं. इतिहासाच्या सुवर्णपानांमध्ये दडलेला हाच प्रेरणादायी अध्याय आता 'शिवप्रताप – गरुडझेप' या आगामी भव्य मराठी चित्रपटात पहायला मिळणार आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख घोषित करण्यात आली असून,




5 ऑक्टोबर 2022 या विजयादशमीच्या मुहूर्तावर शिवप्रताप – गरुडझेप' रसिकांच्या भेटीला येणार आहे. डॉ. अमोल रामसिंग कोल्हे, विलास सावंत, सोनाली घनश्याम राव, चंद्रशेखर ढवळीकर,कार्तिक राजाराम केंढे यांची निर्मिती असलेल्या 'शिवप्रताप – गरुडझेप' या चित्रपटाचं दिग्दर्शन कार्तिक केंढे यांनी केलं आहे. प्रफुल्ल तावरे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत.

# करिना व करिष्मा कपूर नेटकऱ्यांकडून ट्रोल

बॉलिवूड मधील प्रसिद्ध अभिनेत्री करिष्मा कपूर(आणि करीना कपूर या दोन बहिणी तर आहेतच पण त्या दोघींमध्ये मैत्रीचं नातं सुद्धा आहे. या दोघीही एकमेकींच्या खूप जवळ आहेत. करिष्मा आणि करीना या दोघींना लोलो आणि बेबो म्हणूनही ओळखले जाते. या दोघीही काही न काही कारणामुळे सतत चर्चेत सुद्धा असतात. या दोघी बहिणी सतत एकत्र फिरताना सुद्धा दिसतात. नुकतच या दोघींनीही एकल पार्टीत हजेरी लावली होती. त्या पार्टीतील काही फोटो आणि व्हिडीओ समोर आले आहेत. सेलिब्रिटी फॅशन




डिझायनर मनीष मल्होत्रा याच्या घरी एका पार्टीचं आयोजन करण्यात आलं होतं या पार्टीला बॉलिवूड मधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती. करीना कपूर, करिष्मा कपूर, करण जोहर आणि नताशा पुनावाला हे कलाकार पार्टीत सहभागी झाले होते. याचाच एक विडिओ सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.

# कियाराचे धक्कादायक वक्तव्य

अभिनेत्री कियारा अडवाणी आणि शाहिद कपूर कॉफी विथ करण सीझन ७ च्या नव्या भागात दिसणार आहेत. कबीर सिंग चित्रपटात दोघांनी एकत्र काम केले होते. त्यांची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस पडली होती. हीच जोडी कॉफी विथ करण कार्यक्रमात पुन्हा एकदा धमाल करताना दिसत आहेत. याच कार्यक्रमादरम्यान त्यांनी कबीर सिंग चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यानचे किस्से सांगितले आहेत. कियाराने शाहिदबद्दल खटकलेली गोष्ट यात सांगितली आहे.

शाहिदने 'कबीर सिंग' चित्रपटाच्या सेटवर कियाराला ८ तास वाट बघायला लावली होती. किआराने याबाबत सांगितले की, 'चित्रीकरणाचा माझा तिसरा किंवा चौथा दिवस होता आणि पुढच्या सीनसाठी शाहिद कोणते शूज घालणार यावर चर्चा होत असल्याने मला आठ तास वाट पाहण्यास सांगण्यात आले'. यासाठी मला



शाहिदच्या कानशिलात द्यावीशी वाटत होती. करणने हा किस्सा ऐकताच तो देखील म्हणाला, 'मी तुझ्या जागी असतो तर मी देखील हेच केलं असतं'. या प्रकरणावर काय शाहिद म्हणाला आहे, त्यासाठी तुम्हाला पूर्ण भाग बघावा लागेल. गुरुवारी रात्री १२ वाजता डिस्ने हॉटस्टारवर हा भाग प्रदर्शित होणार आहे.

# आदर्श शिंदेचे 'श्रीगणेशा देवा श्रीगणेशा... गाणं लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून सर्वत्र आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरु आहे. यंदाचा हा गणेशोत्सव अधिक चैतन्यमय आणि खास करण्यासाठी "अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लि." घेऊन येत आहे एक भक्तिमय गाणं. "श्रीगणेशा देवा श्रीगणेशा..." हे गाणं लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नुकतेच या गाण्याचे पोस्टर सोशल मीडियावर झळकले असून या गाण्याला आदर्श शिंदे यांचा भारदस्त आवाज लाभला आहे. तर सगळीकडे सकारात्मक वातावरण निर्माण करणाऱ्या या गाण्याला ओंकार घाडी यांनी शब्दबद्ध केले असून काशी रिचर्ड यांचे या गाण्याला संगीत लाभले आहे. "अल्ट्रा




मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लि. प्रस्तुत या गाण्याचे सुशिलकुमार अग्रवाल निर्माता आहेत.

गणपती हा बुद्धीचा दैवत आहे, विघ्नहर्ता आहे, तारणकर्ता आहे. त्याची मनोभावे आराधना केल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात. महाराष्ट्रात गणेशोत्सव सर्वत्र अगदी उत्साहात साजरा केला जातो. त्यात 'श्रीगणेशा' या गाण्याने हा उत्साह द्विगुणित होणार आहे.

# दिया मिर्झाने बाळाच्या जन्मावेळीचा अनुभव शेअर केला

'रहना है तेरे दिल में' या एव्हरग्रीन लव्हस्टोरीतून अभिनेत्री दिया मिर्झाने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. ती अगदी मोजक्याच चित्रपटांमध्ये झळकली. सहजसोप्या अभिनयाने दियाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. गेल्या वर्षी मे महिन्यात तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. "गरोदरपणाच्या पाचव्या महिन्यात माझ्या बाळाचा, अव्यानचा जन्म झाला. त्यामुळे हा काळ माझ्यासाठी खूप भयानक होता" असे दियाने एका मुलाखतीमध्ये सांगितले.

बॉलिवूड हंगामाला दिलेल्या मुलाखती दरम्यान दियाने गरोदर असतानाचा अनुभव सांगितला. दिया म्हणाली की, "माझ्या पोटात बॅक्टेरियल



इंन्फेक्शन झाले होते. या इंन्फेक्शनचा परिणाम अव्यानवर होऊ शकतो असे डॉक्टरांनी सांगितले.

# आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत शुभमन गिलची ‘हनुमान उडी!

## तर विराट कोहली पाचव्या अन् रोहीत शर्मा...

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।




बुधवारी ‘आयसीसी’ने एकदिवसीय फलंदाजांची क्रमवारी जाहीर केली. या क्रमवारीत भारताच समामीवीर फलंदाज शुभमन गिल ४५ स्थानांनी झेप घेत ३८व्या स्थानावर पोहोचला आहे. तर विराट कोहलीने आपले स्थान पाचवे स्थान कायम ठेवले आहे. भारताचा सलामीवीर शुभमन गिल बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसीच्या एकदिवसीय क्रमवारीत ४५ स्थानांनी झेप घेत ३८व्या स्थानावर पोहोचला आहे. झिम्बाब्वेविरुद्ध नुकत्याच झालेल्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत त्याने चमकदार कामगिरी केली होती. हरारे येथील शेवटच्या सामन्यात त्याने पहिले शतक झळकावले. गिलने ९७ चेंडूत १३० धावा केल्या होत्या.

दरम्यान, या क्रमवारीत भारताचा माजी कर्णधार विराट कोहली ७४४ रेटिंग पाचव्या स्थानावर कायम आहे. तर कर्णधार रोहित शर्मा सहाव्या स्थानावर आहे. शिखर धवनला एका स्थानाचा फटका बसला असून तो १२व्या स्थानावर आहे. झिम्बाब्वेविरुद्ध झालेल्या तीन सामन्यांत त्याने १५४ धावा केल्या होत्या. धवनने पहिल्या आणि तिसऱ्या सामन्यात अर्धशतक झळकावले होते.

या क्रमावारीत पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम ८९१ गुणांसह पहिल्या स्थानावर कायम आहे. दक्षिण आफ्रिकेचा रुसी व्हॅन डर डुसेन ७८९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. गोलंदाजांच्या क्रमवारीत न्यूझीलंडचा स्टार वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ट पहिल्या स्थानावर आहे. तर भारताचा जसप्रीत बुमराह चौथ्या स्थानावर आहे. तसेच बांगलादेशचा शाकिब अल हसन अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत पहिल्या स्थानावर आहे. या यादीत पहिल्या दहामध्ये एकही भारतीय खेळाडू नाही.

## शॉर्ट न्यूज »

### नीरज चोप्रा डायमंड लीगमध्ये खेळणार



नवी दिल्ली । महाईन्यूज

लुसाने येथे होणाऱ्या डायमंड लीग ॲथलेटिक्स स्पर्धेत शुक्रवारी स्नायूंच्या दुखापतीतून सावरलेल्या नीरज चोप्राच्या कामगिरीकडे क्रीडाक्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे.या स्पर्धेत चांगली कामगिरी करून नीरजला पुढील महिन्यात झुरिच येथे होणाऱ्या डायमंड लीग अंतिम स्पर्धेत खेळण्याची संधी मिळेल. नीरज सध्या चौथ्या स्थानावर आहे.नीरजला दुखापतीमुळे राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार घ्यावी लागली होती. स्पर्धेच्या दोन दिवस आधी त्याने माघारीचा निर्णय घेतला. त्याला चार आठवडे विश्रांतीचा सल्ला देण्यात आला होता.डायमंड लीग आयोजकांनी १७ ऑगस्ट रोजीच जाहीर केलेल्या स्पर्धकांच्या यादीत नीरजच्या नावाचा समावेश होता. फक्त, त्यावेळी आयोजकांनी त्याच्या नावापुढे तंदुरुस्तीवर नीरजचा सहभाग अवलंबून असल्याचे नमूद केले होते.

# एकदिवसीय क्रिकेट सामने ४० षटकांचे व्हावेत -स्टोक्स

### ‘आयपीएल’मधील सहभागाचा निर्णय इंग्लिश हंगामावर अवलंबून



। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

ट्वेन्टी-२० लीगच्या लाटेत अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंनी आपले प्राधान्यक्रम बदलले आहेत. इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने पुढील वर्षीच्या ‘आयपीएल’मधील सहभागाचा निर्णय इंग्लिश हंगामावर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले आहे.

जागतिक क्रिकेटमधील अग्रगण्य अष्टपैलू खेळाडू म्हणून ख्याती असलेल्या स्टोक्सने आधीच एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती पत्करली आहे. खेळ आणि जीवन या ताणाचा समन्वय साधता यावा, यासाठी त्याने हा निर्णय घेतल्याचे म्हटले होते. त्यामुळे भारत टी 20 वर्ल्डकपमधील पराभवाचा बदला. त्याच मैदानावर घेण्यासाठी जोर लावले. दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिरातीच्या नव्या ट्वेन्टी-२० लीगमुळे आंतरराष्ट्रीय कार्यक्रमपत्रिकांवर बराचसा ताण आला आहे. यावर मात करण्यासाठी एकदिवसीय क्रिकेट सामने ४० षटकांचे खेळवण्यात यावेत, अशी सूचना स्टोक्सने केली आहे.

एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय हा आव्हानात्मक होता. कारकीर्द अधिक टिकावी, याच हेतूने हा निर्णय घेतल्याचे स्टोक्सने सांगितले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही